# नवीन शैक्षणिक धोरण २०२०

**डॉ. गामा मुकुंदराव सेलोकर**
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती.सुग्रता वंजारी महिला महाविद्यालय वडोदा
ता.कामठी जि.नागपुर (महा)
gamaselokar20@gmail.com
9823521187

---

**प्रस्तावना**

शिक्षणामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगती होते या कारणास्तव शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील देशासाठी चांगले परिभाषित आणि भविष्य शिक्षण धोरण आवश्यक आहे. परंपरा आणि संस्कृतीचा विचार करुन भिन्न देश वेगवेगळया शैक्षणिक पध्दतीचा अवलंब करतात. शाळा आणि महाविद्यालयीन शिक्षण पातळीवर आयुष्यादरम्यान वेगवेगळया चरणांचा अवलंब करतात. जेणे करुन ते प्रभावी होईल. अलीकडेच भारत सरकारने आपले नवीन शैक्षणिक धोरण जाहिर केले जे भारतीय अंतराळ संशोधन संघटनेचे (इसरो) माजी अध्यक्ष डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या तज्ज्ञ समीतीच्या शिफारशीवर आधारित आहे. या पेपर मध्ये उच्चशिक्षण प्रणालीत घोषित केलेल्या विविध धोरणांवर प्रकाश टाकला आहे.

एनईपी २०२० चे विविध गुणधर्म आणि भविष्यवाढ होण्याबाबत भारतीय उच्च शिक्षण प्रणालीवरील गुणवत्तेसह चर्चा केली जाते. शेवटी, त्याची उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी काही सूचना प्रस्तावित आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणणारे नवीन शैक्षणिक धोरण केंद्र शासनाने संमत केले आहे. येणाऱ्या दोन वर्षानंतर टप्याटप्याने त्याची संपूर्ण देशभर अंमलबजावणी होईल. त्यातील अमंलबजावणीचे टप्पे, येणाऱ्या अडचणी व संस्था, प्रत्यक्ष शाळा, महाविद्यालय, विदयार्थी यांनी करावयाच्या गोष्टी, व शासनाने करावयाच्या गोष्टी या दोन्हीचा तपाशीलात विचार करता येईल. शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण यांच्यात मोठया प्रमाणात परिवर्तन आणि सुधारणांना वाव देण्यात आला आहे. २१ व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असून ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. या शिक्षणाची उभारणी सर्वांना परडवणारे असून हे शिक्षण घेण्यासाठी सर्वांना संधी देण्यात येणार आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सागंड घालण्यात आली आहे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र असून बहू शाखीय आहेत २१ व्या शतकातील ज्या गरजा आहेत त्याना अनुरुप करत भारतीय समाज आणि जागतिक ज्ञान एक महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या आगळया क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उददेश राहणार आहे.

**संशोधनाचे उद्देश**

- नवीन राष्ट्रीय उच्च शिक्षणामधील नवकल्पना ओळखणे धोरण २०२० वर
- एनईपी २०२० च्या उच्च शिक्षण धोरणाच्या गुणवत्तेबद्दल चर्चा करणे.
- नव्याने स्वीकारलेल्या उच्चांच्या धोरणावर प्रकाश टाकणे आणि त्यांचे पुनरावलोकन करण्यासाठी शिक्षण प्रणाली (एनईपी २०२०)
- मातृभाषेमध्ये शिक्षणाची पर्यायी व्यवस्थेचे स्पष्ट निर्देश तपासणे.
- नवनिर्मितीच्या व्यापक संधीची शोध घेणे.

**<u>गृहितके</u>**

- नवीन शैक्षणिक धोरण अतिशय आवश्यक आहे.
- शिक्षण हा केंद्र व राज्य या दोन्हीच्या संयुक्त सूचीतील विषय आहे.
- एनईपी २०२० च्या मसुदा समितीने धोरणांचे डिझाईन करण्याच्या सर्वकष प्रयत्न केला आहे.
- प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच आवश्यक आहे.
- आजपर्यंतचे शिक्षण पूर्णपणे पाश्चात्य जीवनदर्शनांवर आधारित आहे.

**शोध निबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधनाची पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी वापरण्यात येणारी माहिती व तथ्ये ही विषयाशी संबंधित विविध पुस्तके, मासिके, लेख, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळावरुन संकलित करण्यात आली आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण**

शिक्षण हे राज्य आणि केंद्र या दोन्हीच्याही सुचीतील विषय असून केवळ केंद्र सरकारने धोरण घोषित करुन चालणार नाही त्याची अमलबजावनी केंद्राप्रमाणेच राज्यशासनाने करावी लागेल शिक्षण खात्यामध्ये बदल करणे गरजे आहे उदा. नवीन शैक्षणिक धोरणानुसार दहावीच्या व बारवीच्या बोर्ड परीक्षा आता होणार नाहीत. किंवा त्यांचे स्वरुपामध्ये बदल आपल्याला दिसेल त्याकरिता एस एस सी बोर्डची पुनर्रचना करावी लागेल. आज शिक्षण खात्यामध्ये शालेय, उच्चशिक्षण तंत्रशिक्षण हे प्रमुख विभाग असून त्याऐवजी प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण वेगवेगळे विभाग करणे आवश्यक आहे.

उच्च माध्यमिक विभागामध्ये तंत्रशिक्षणाचा समावेश असेल. पहिला वर्ग दुसरा वर्ग यांची जुळवा जुळव पूर्व प्राथमिक वर्गात करावी लागणार. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे प्राथमिक शिक्षण हे अधिकृत नाही. आज छोटया मोठया गल्लीत देखील बालवडया, अंगणवाडया यांचे शिक्षणाचे वर्ग चालत आहेत. असे सर्व वर्ग बंद करुन त्यांची जोडणी शाळांना करावी लागणार आहे. प्राथमिक वर्गासाठी खेळणी, उद्याने, मोकळी जागा तसेच प्रशिक्षिक शिक्षक उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. मानव प्राण्यांचा वयाच्या आजच्या वर्षापर्यंत ८० टक्के, विकास होतो हे आता सिध्द झाले म्हणूनच विकासाच्या प्रमुख टप्प्यात विदयार्थांना जास्तीत जास्त सर्वांगीण विकास होणे ही जबाबदारी पूर्व प्राथमिक शिक्षकांवर राहणार हे लक्षात घेऊनच त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे.

आज संपूर्ण देशात इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जात आहे. निश्चितच इंग्रजी ही या सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शांळाचे भवितव्य काय राहणार आहे. म्हणूनच नवीन शैक्षणिक धोरणात म्हटले आहे की, प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच दिले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणात म्हटले आहे की, एखाद्या विषयात एखादा विदयार्थी जर नापास झाला. तर त्याला नापास न करता त्याच्या इतर विषयांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्याला पुढच्या वर्गात प्रवेश देण्यात यावा. अशा मुलांना परीक्षेचे प्रमाणपत्र देण्याकरिता वेगळा विचार करावा. नवीन शैक्षणिक धोरणात कला क्रीडा, विविध उपक्रमांना स्वतंत्र सन्मानाचे स्थान दिले आहे. तसेच पाचवी व आठवीच्या वर्गांना घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती (स्कॉलरशीप) परीक्षा काय स्वरुपात चालू राहतील या विषयी कोणत्याही धोरणाचा नवीन शैक्षणिक धोरणात उल्लेख नाही. D.ed, B.ed महाविद्यालय बंद करुन इंटिग्रेटेड B.ed हा कोर्स निर्माण करण्याची सूचना या नवीन शैक्षणिक धोरणात दिली आहे. आता

पर्यंत पदवी मिळाल्यावर समजा इतर कुठलीही नौकरी मिळाली नाही तर शिक्षकाच्या नौकरीसाठी प्रयत्न केला जात होता. पण आता तो विचार बदलेला आहे. कारण शिक्षक बनण्याकरिता कोणत्या विषयाचा शिक्षक आणि त्या विषयाची जागा असणे तसेच एक जागा आणि उमेदवार शंभर हा चित्र आपल्याला पाहायला मिळातो. म्हणून कोणत्या विषयाच्या शिक्षक होणार आहे. त्याची निवड करुन या विषयाचा अधिक तपशील अभ्यास केला जाणे अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणक्रमात मोठे बदल सुचवलेले आहेत. देशातील ५० हजारांहून अधिक महाविद्यालये बंद करुन जी महाविदयालय सक्षम आहेत. अशीच महाविदयालयीन उच्च शिक्षणासाठी चालू ठेवण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहेत महाविद्यालयाची निवड करुन त्या महाविद्यालयांना सक्षम शैक्षणिक शिक्षण देण्यासाठी सोयी व सुविधा उपलब्ध करुन, प्रभावी संशोधन प्रकल्प सुविधा उपलब्ध करुन त्याची जबाबदारी शासनावर असणार आहे तसेच जे महाविद्यालय बंद होणार आहेत. तेथील शिक्षक यांचे समायोजन करावे लागणार आहेत. तसेच महाविद्यालयाची इमारत, अन्य साधन साम्रगी यांचे सुध्दा समायोजन करावे लागणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणक्रमात पीएच.डी. ला पर्यायी असलेली एम. फिल ही परीक्षा रद्द करण्यात आली आहे. पीएच.डी. ला प्रवेश घेण्यापूर्वी त्या विषयाची लेखी व प्रात्याक्षिक परीक्षा देऊन त्या विदयार्थाला आपली पात्रता सिध्द करावी लागेल. संशोधन हे केवळ नावापुरते किंवा पूर्वी केलेल्या एखादया कामाची पुनरावृत्ती असू नये. नवीन शैक्षणिक अभिमत विद्यापीठांचे, ऑटोनॉमश महाविद्यालयाचे व खाजगी शिक्षण संस्थाचे, योगदान खूप महत्वाचे असणार आहे. शिक्षण संकुल ही संकल्पना महत्त्वाची आहे. यामध्ये केंद्रस्थानी सक्षम शाळा, महाविद्यालय राहणार आहेत. संस्थेच्या अधिन असलेल्या शाळा, महाविद्यालय यांना सक्षम बनवणे तसेच त्यांना आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देणे, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही संकुलातील प्रमुख शाळा व महाविद्यालयाची जबाबदारी असणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसाय मार्गदर्शन हा विषय वर्ग सहावी या वर्गापासून जोडण्यात आला आहे.

अशा पध्दतीने व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरिता यंत्रणा सर्व शाळांमध्ये उपलब्ध असणे कठीण आहे. याकरिता सक्षम प्रशिक्षक निवडणे, उत्तम वर्कशॉप पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हे प्रत्येक शाळेला शक्य होणार नाही. संकुल केंद्रातील शाळेने ती व्यवस्था करावी अशी अपेक्षा आहे. शिक्षक प्रशिक्षणार्थी जे महाविद्यालय आहेत ते एक मोठे आव्हानच आहे. जे अभिनत महाविद्यालय आहेत त्यांनी हा विषय घ्यावा. अशी शासनाची अपेक्षा आहे. ज्या महाविद्यालयात अधिकाधिक विषय शिकविले जातात तिथे हे महाविद्यालय जोडले जाऊ शकते. याचे कारण चार वर्षाच्या शिक्षक अभ्यासक्रमात विविध विषयांची प्राथमिक माहिती दिली जाईल. कौशल्य दिली जातील त्याबरोबर एक विषय विशेष अभ्यासाचा म्हणून निवडावा लागेल. कनिष्ठ महाविद्यालयात किवा वरिष्ठ महाविद्यालयात वेगवेगळे विषय शिकवले जाणे अपेक्षित आहे त्या सर्व विषयांचे तज्ज्ञ शिक्षक या शिक्षक महाविद्यालयात तयार करावे लागतील. जसे D.ed झालेल्या शिक्षक प्राथमिक शाळेत कोणताही विषय शिकवायचा आणि B.ed झालेल्या शिक्षक एक किंवा दोन विषयामध्ये नैपुण्य प्राप्त करुन माध्यामिक शाळेत शिकवत असे परंतु आता उच्च माध्यामिक व उच्च महाविद्यालयात विषयांची व्याप्ती पुष्कळ अधिक होणार आहे जी शिक्षक महाविद्यालय आहेत त्यांना आता पूर्वीच्या सहा सात विषंयाऐवजी आता तीस चाळीस विषयाचे तज्ज्ञ शिक्षक तयार करावे लागतील. हे एक मोठे आव्हानच आहे

ग्रामीण व शहरी भागात कोठे आणि कोणत्या विषयांचे शिक्षण दिले जाणार आणि कोणत्या विषयांचे शिक्षण दिले जाणार आणि नेमके, शिक्षकाची संख्या किती हे ठरवून त्या विषयाची शिक्षकांची शाळा

महाविद्यालयात भरती करावी लागेल आणि या नुसारचे शिक्षण महाविद्यालयात मधील प्रशिक्षणार्थी व विद्यार्थीसंख्या ठरवावी लागेल. अशा पध्दतीचे आव्हान साभाळण्याची जबाबदारी अधिक सक्षम असलेल्या संस्था व महाविद्यालयांना उचलावी लागणार आहे.

उच्च शिक्षणामध्ये संशोधनाला मोठया प्रमाणात महत्त्व दिले आहे. जे संशोधनाचे विषय आहेत त्या करिता आवश्यक सर्व सुविधा महाविद्यालयात उपलब्ध होणार आहेत परंतु सर्वच महाविद्यालयात सर्व सुविधा उपलब्ध होणार नाहीत. जसे रसायनशास्त्र विषयात संशोधन करायचे असेल तर जी.सी.एच.पी एस.सी,एफ. टी.आय.आर,एन.एम.आर.यू.व्ही. व्हिजिबल स्पेक्ट्रोफोटोमीटर या सारखी उपकरणे उपलब्ध करून द्यावी लागतील. ही उपलब्ध करण्याची क्षमता काही संस्थाकडे असू शकते. ही उपकरणे विकत घेण्यासाठी राज्य आणि केंद्रशासनाने आवश्यक ती जर्नल्स उपलबर्ध करून तसेच विशेष ग्रंथालये उपलब्ध करून द्यायाला पाहिजे.

कला, वाणिज्य व्यवस्थापन या शाखेतील विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण करणे आवश्यक असते. त्याना प्रथम प्राथमिक जुळणी करून देण्याचे काम एखाद्या विशिष्ट गटाकडे सोपविले तर संशोधकाचे काम हे जास्त प्रमाणात सोपे होईल. संशोधन समाजाला उपयुक्तच असते आणि त्यातून समाजातील असणाऱ्या समस्यावर उपाय म्हणूनसुध्दा फायद्याचेच ठरत असते. म्हणूनच संशोधनाचा दर्जा तपासणे, त्याची उपयुक्तता तपासणे, निकृष्ट दर्जाचे संशोधन वेगळे काढणे आवश्यक आहे. तसेच उत्तम दर्जाचे संशोधन जर्नलमध्ये प्रसिध्दीस पाठविणे आवश्यक आहे. संशोधनाच्या बाबतीत जगातील विकसित देशाच्या संशोधनाच्या तुलणेत भारतातील संशोधन हे अंत्यत अपुरे आणि निकृष्ट दर्जाचे आहे अशी टीका भारतावर केली जात आहे. संशोधनाला योग्य दिशा देऊन त्याचा विकासाला उपयोग करून देणे ही एक संधी प्राप्त झालेली आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत पण त्या सोबतच नवनिर्मितीची संधी ही उपलब्ध झाली आहेत. देशाचा विकास म्हणजे शैक्षणिक विकास होय. तो सुसंगत असतो. शैक्षणिक विकासाकडे शासनाने लक्ष दिले नाही. त्याचा परिणाम म्हणजेच देशाचा विकासही झाला नाही. शासनाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या रूपात शासनाने शैक्षणिक बदलाचे मोठे पाऊल उचलले आहेत आणि याला इतर संस्थानी प्रतिसाद द्यायला हवा. हा केवळ शिक्षणाचाच नाही तर संपूर्ण देशाचा विकास यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**<u>निष्कर्ष</u>**

- नवीन शैक्षणिक धोरण हे बदलत्या काळानुसार बरोबर आहे असे दिसून येत आहे.
- उच्च माध्यमीक विभागामध्ये तंत्रज्ञानांचा उपयोग करण्यात येणार आहे.
- इंग्रजी माध्यमाच्या पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा अस्तित्वात आहेत. पण इंग्लिश हा या सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शाळांचे भवितव्य सांगता येत नाही म्हणून प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे असे निर्दशनास येते.
- प्राथमिक वर्गासाठी खेळणी, उद्याने, मोकळी जागा आणि प्रशिक्षिक शिक्षक असे गरजेचे आहेत.
- नवीन शैक्षणिक धोरण हे राज्य आणि केंद्र या दोन्हीच्या एकत्रिकरणातून यशस्वी होणार.
- नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक ही नोकरी करण्यामध्ये आता पदवी धारकाचा कल कमी होणार आहे.

- नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात मोठया प्रमाणात बदल सुचवलेले आहेत. जी महाविद्यालय सक्षम नाहीत त्यांना बंद करण्यात यावे असे सुचवलेले आहेत.
- राष्ट्र निर्माण करण्यात शिक्षणाची प्रमुख भूमिका असते असे लक्षात येते.
- नवीन शैक्षणिक धोरणात अभिमत विघापीठाचे महाविद्यालय व खाजगी शिक्षण संस्थेचे योगदान खुप महत्वाचे आहेत असे दिसून येते.
- एन ई पी २०२० च्या धोरणनुसार व्यवसाय मार्गदर्शन या विषयाला महत्व दिले आहे.
- एन ई पी २०२० च्या धोरणानुसार विद्यार्थाना पुर्वपरीक्षेच्या माध्यमातून आपली पात्रता सिद्ध करावी लागणार आहे.
- नावीन शैक्षणिक धोरणानुसार संशोधन हे केवळ नावापुरते किंवा पुनरावृत्ती असू नये असे लक्षात येते.

**उपाययोजना**

- शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे गरजेचे आहे.
- शिक्षण क्षेत्रात संशोधनावर सरकारी खर्च वाढवणे आवश्यक आहे.
- सर्वसमावेशक शिक्षण प्रणालीवर जोर देणे आवश्यक आहे.
- शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी नावीन्यपूर्ण आणि संशोधनास चालना देण्याची नवीन शिक्षण धोरणात तरतूद करणे गरजेचे आहे.
- नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्या करिता ठोस उपाय करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. विश्वकोश

२. वर्तमानपत्र : नवभारत, लोकमत, टाईम्स ऑफ इंडिया

३. **<u>संकेतस्थळ</u>**

1.https://hindijaankaari.in/New-shikshaneeti-nibandh-essay-education-policy
2.https://www.hindikiduniya.com/essayon-new-education-policy
3.https://www.evivek.com/Encyz/2020
4.https://www.bbc.com/Marathi/india